Head Office, Lokmangal
1501, Shivaji Nagar, Pune 411005
020- 25614324
media@mahabank.co.in

## वृत्तपत्रीय निवेदन

**दिनांक 15 ऑक्टोबर 2024**

**30th सप्टेंबर, 2024 रोजी समाप्त झालेल्या तिमाहीसाठी अर्धवार्षिक वित्तीय कामगिरी**

**कामगिरीवर एक दृष्टीक्षेप**

**30 सप्टेंबर 2023** रोजी समाप्त तिमाहीच्या तुलनेत **30 सप्टेंबर 2024** रोजी समाप्त तिमाही मधील कामगिरी **,**

- एकूण व्यवसाय **16.90%** वाढून **₹493,793 .**
- एकूण ठेवी **15.46%** वाढून **₹ 276,289** कोटी.
- एकूण कर्ज व्यवहार **18.78%** वाढून **₹ 217,504** कोटी.
- कर्ज व ठेवी यांचे प्रमाण सुधारून **78.72%.**
- **30.09.2024** रोजी ढोबळ एन पी ए चे प्रमाणात **1.84%** पर्यंत घट.
- **30.09.2024** रोजी निव्वळ एन पी ए चे प्रमाणात **0.20%** पर्यंत घट.
- तरतूद समावेशन गुणोत्तर **98.31%.**
- निव्वळ नफा **44.25%** वाढून **₹1,327** कोटी.
- **परिचालन नफ्यात 14.66% वाढून ₹ 2,202** कोटी.
- **निव्वळ व्याज उत्पन्न 15.41% वाढून ₹ 2,807** कोटी.
- निव्वळ व्याज दुराव्यात **(NIM)** सुधारणा होऊन **3.98%.**
- खर्च व उत्पन्न प्रमाणात सुधारणा होऊन **at 38.81%.**
- अस्तीवरील परताव्यात **(ROA)** सुधारणा होऊन **1.74%.**
- भांडवलावरील परताव्यात **(ROE)** सुधारणा होऊन **26.01%.**

- भांडवलातील ( भारीत ) जोखिमी अस्तीचे गुणोत्तर **17.26%** त्यापैकी प्रथम श्रेणीचे भांडवल **13.13%.**

**नफाक्षमता (** दिनांक **30th, सप्टेंबर 2024** रोजी समाप्त तिमाही )

- वित्त वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीतील ₹920 **कोटी** निव्वळ नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2024 च्या दुसऱ्या तिमाहीत 44.25% वाढ होऊन निव्वळ नफा ₹1,327 **कोटी** .
- वित्त वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीतील ₹1,920 कोटी परीचालानात्मक नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2024 च्या दुसऱ्या तिमाहीतील परीचालानात्मक नफा 14.66% वाढ होऊन ₹ 2,202 कोटी .
- वित्त वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीतील निव्वळ व्याज उत्पन्न ₹2,432 कोटीच्या तुलनेत वार्षिक आधारावर 15.41% वाढ होऊन वित्त वर्ष 2024 च्या दुसऱ्या तिमाहीत निव्वळ व्याज उत्पन्न ₹2,807 कोटी.
- वित्त वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीतील निव्वळ महसूल ( निव्वळ व्याज उत्पन्न + अन्य उत्पन्न ) ₹ 3,100 कोटीच्या तुलनेत वित्त वर्ष 2024 च्या दुसऱ्या तिमाहीत 16.10% **ने वाढून** ₹ 3,599 कोटी
- वित्तीय वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीत खर्च व उत्पन्न यांच्या असलेल्या 38.04% गुणोत्तरात वित्तीय वर्ष 2024 च्या दुसऱ्या तिमाहीत 38.81% पर्यंत सुधारणा. दिनांक 30 जून 2024 रोजी समाप्त तिमाहीत हेच गुणोत्तर 37.87%.
- अस्तिवरील परताव्यात वित्तीय वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीतील 1.37% **व** वित्तीय वर्ष 2024 च्या पहिल्या तिमाहीतील 1.72% च्या तुलनेत दुसऱ्या तिमाहीत 1.74 % पर्यंत सुधारणा.
- समभागावरील परताव्यात वित्तीय वर्ष 2023 च्या दुसऱ्या तिमाहीतील 23.25% च्या तुलनेत वित्तीय वर्ष 2024 च्या दुसऱ्या तिमाहीत 23.25% पर्यंत सुधारणा.
- **नफाक्षमता (**दिनांक 30 सप्टेंबर 2024 रोजी समाप्त सहामाही)
- 30.09.2023 रोजी समाप्त पहिल्या सहामाहीत ₹ 1,802 कोटी निव्वळ नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीत 82.57% वाढ होऊन निव्वळ नफा ₹818 कोटी ने वाढून ₹ 2620 कोटी
- वित्त वर्ष 2023 च्या पहिल्या सहामाहीतील ₹ 3,784 कोटीच्या परीचालानात्मक नफ्याच्या तुलनेत वार्षिक आधारावर वित्त वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीतील परीचालानात्मक नफा 18.83 % वाढ होऊन रु 4496 कोटी.

- वित्त वर्ष 2023 च्या पहिल्या सहामाहीतील निव्वळ व्याज उत्पन्न रु 4,772 कोटीच्या तुलनेत वार्षिक आधारावर 17.48 % वाढ होऊन वित्त वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीतील निव्वळ व्याज उत्पन्न रु 5,606 कोटी आहे.
- दिनांक 30.सप्टेंबर 2024 रोजी समाप्त वित्त वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीमध्ये शुल्काधारित उत्पन्न वार्षिक आधारावर 14.30 % वाढून रु 808 कोटी
- वित्त वर्ष 2023 च्या पहिल्या सहामाहीतील खर्च व उत्पन्न यांच्या असलेल्या गुणोत्तरात 37.65 % वरून वित्तीय वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीत 38.34% पर्यंत सुधारणा.
- अस्तिवरील परताव्यात वित्तीय वर्ष 2023 च्या पहिल्या सहामाहीतील 1.35 % च्या तुलनेत वित्तीय वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीत 1.73% पर्यंत सुधारणा.
- समभागावरील परताव्यात वित्तीय वर्ष 2023 च्या पहिल्या सहामाहीतील 23.31% च्या तुलनेत वित्तीय वर्ष 2024 च्या पहिल्या सहामाहीत 25.68 % पर्यंत सुधारणा .

**अस्ति व दायीत्वे (**दिनांक **30** सप्टेंबर**, 2024** रोजी**)**

- वार्षिक आधारावर एकूण व्यवसायात 16.90 % वाढ होऊन ₹ 493,793 कोटी .
- वार्षिक आधारावर एकूण ठेवी 15.46 % वाढून **₹** 276,289 कोटी.
- वार्षिक आधारावर एकूण कर्ज व्यवहार 18.78 % वाढून **₹** 217,504 कोटी .
- वार्षिक आधारावर रिटेल, शेती व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राशी निगडीत व्यवसायात 25.96% वाढ
- रिटेल, शेती व सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग क्षेत्राशी निगडीत कर्जवाटपात अनुक्रमे 22.53%, 33.86%, &24.96% वाढ .

**भांडवल पर्याप्तता : (** दिनांक **30** सप्टेंबर**, 2024** रोजी **)**

- एकूण बेसिल 3 भांडवल पर्याप्तता अनुपात 17.26 % पर्यंत सुधारणा व त्यापैकी प्रथम श्रेणीतील सर्वसामान्य समभाग गुणोत्तर 11.97%.

अस्तिंची गुणवत्ता **: (**दिनांक **30** सप्टेंबर**, 2024** रोजी **)**

- दिनांक 30.09.2023 च्या तुलनेत ढोबळ एन पी ए चे 2.19 % प्रमाण हे 30.09.2024 रोजी सुधारणा होऊन 1.84% पर्यंत घटले आहे . दिनांक 30.06.2024 रोजी हेच प्रमाण 1.85% होते .
- दिनांक 30.09.2023 च्या तुलनेत निव्वळ एन पी ए चे 0.23 % प्रमाण हे 30.09.2024 रोजी सुधारणा होऊन 0.20% पर्यंत घटले आहे . दिनांक 30.06.2024 रोजी देखील हेच प्रमाण 0.20 % होते.
- दिनांक 30.09.2023 च्या तुलनेत तरतूद समावेशन गुणोत्तराचे चे 98.40% प्रमाण हे 30.09.2024 रोजी घटून 98.31% . दिनांक 30.06.2024 रोजी हेच प्रमाण 98.36% होते .
- दिनांक 30th सप्टेंबर 2024 रोजी बँकेकडे कोव्हीड तरतूद म्हणून एकूण ₹ 1,200 कोटी रक्कम उपलब्ध आहे.

गुंतवणूकदरांसाठी सादरीकरण बँकेच्या www.bankofmaharashtra.in या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे सादर करण्यात आले आहे

## उच्च श्रेणी व्यवसाय

**(₹ कोटी)**

| तपशील | रोजी समाप्त सहामाही | | वाढ (%) |
|---|---|---|---|
| | सप्टेंबर 23 | सप्टेंबर 24 | वार्षिक |
| एकूण व्यवसाय | 422,420 | 493,793 | 16.90 |
| ठेवी | 239,298 | 276,289 | 15.46 |
| त्यापैकी कासा | *121,337* | *136,174* | 12.23 |
| एकूण ठेवीमध्ये कासाचा हिस्सा | *50.71* | *49.29* | |
| ढोबळ कर्जे | 183,122 | 217,504 | 18.78 |

## नफाक्षमता

**(₹ in कोटी)**

| तपशील | रोजी समाप्त तिमाही | | | बदल (%) |
|---|---|---|---|---|
| | सप्टेंबर 23 | जून 24 | सप्टेंबर 24 | वार्षिक |
| एकूण उत्पन्न | 5,736 | 6,769 | 6,809 | 18.72 |
| एकूण खर्च | 3,815 | 4,474 | 4,607 | 20.76 |
| परीचालानात्मक नफा | 1,920 | 2,294 | 2,202 | 14.66 |
| कर वगळता अन्य अपरिहार्य तरतुदी | 985 | 950 | 822 | (16.52) |
| करपूर्व नफा | 936 | 1,344 | 1,380 | 47.48 |
| कर | 16 | 50 | 53 | 235.10 |
| निव्वळ नफा | 920 | 1,293 | 1,327 | 44.25 |

## ताळेबंद

**(₹ in कोटी)**

| दायीत्वे | रोजी समाप्त सहामाही | |
|---|---|---|
| | सप्टेंबर 23 | सप्टेंबर 24 |
| भांडवल | 7,081 | 7,081 |
| राखीव व अधिशेष | 11,331 | 15,605 |
| ठेवी | 239,298 | 276,289 |
| कर्जे | 8,654 | 10,482 |
| अन्य दायित्वे व तरतूदी | 6,820 | 7,518 |
| एकूण | **273,184** | **316,975** |
| **अस्ति** | | |
| रोकड व भारतीय रिझर्व बँकेतील शिल्लक रक्कम | 14,221 | 16,574 |
| अन्य बँकांच्या मधील शिल्लक रक्कम व अल्प सूचनेवर प्राप्तव्य रकमा | 543 | 22 |
| गुंतवणूक | 70,179 | 77,816 |
| कर्जे ( निव्वळ ) | 179,515 | 213,927 |
| स्थावर अस्ति | 2,145 | 2,379 |
| अन्य अस्ति | 6,582 | 6,258 |
| एकूण | **273,184** | **316,975** |